# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात
**{प्रधानमंत्री आ. योजना कक्ष}** तथा नागपूर शहरात अंमलबजावणी माहे डिसेंबर 2015 पासून करण्यात आली असुन सदर योजनेची मुदत डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात येत आहे. मात्र, अजूनही देशात परवडणा-या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दि.01/09/2024 पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची देशात अंमलबजावणी करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून राज्य शासनाने शासन निर्णय क्रं. प्रआयो – 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 अन्वये सदर योजना राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 ही योजना नागरी क्षेत्राकरीता दि.01/09/2024 पासुन पाच वर्षाकरीता राबविण्यात येणार आहे. सर्व पात्र कुटुंबाना / लाभार्थ्यांना घर उपलब्ध करून देण्याकरीता केन्द्र शासनाच्या आर्थीक सहाय्याने राज्य शासनामार्फत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

**<u>सदर्हु योजनेची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत</u> -**

- सदर योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) शौचालय व अन्य पायाभूत नागरी सुविधांसह 30 चौ.मी. ते 45 चौ.मी. (चटई क्षेत्रफळ) पर्यंतची घरे बांधण्यास परवानगी आहे.
- सदर योजनेंतर्गत खालील चार घटकांचा समावेश आहे.
  i. वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधकाम (BLC)
  ii. भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (AHP)
  iii. भाडे तत्वावर परवडणारी घरे (ARH)
  iv. व्याज अनुदान योजना (ISS)

**<u>योजनेकरीता पात्र लाभार्थी निकष</u>** :-

- लाभार्थी कुटुंबामध्ये, पती – पत्नी व अविवाहीत मुले / मुली यांचा समावेश असेल.
- या योजनेतंर्गत अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.
- लाभार्थ्यांने गेल्या 20 वर्षात कोणत्याही शासकीय (घरकुल) योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**<u>पात्र लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा</u> -**

- दहा लाखाहून जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी (EWS)रुपये 6 लाख इतकी कमाल वार्षीक उत्पन्न मर्यादा निश्चित केलेली आहे.

**<u>केंद्र व राज्य शासनातर्फे योजनेतंर्गत घटक निहाय लाभ</u>** –

| अक्रं | घटक | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|---|
| 1 | BLC | रुपये 1.5 लाख प्रति लाभार्थी | रुपये 1 लाख प्रति लाभार्थी |
| 2 | AHP | 1. केंद्र हिस्सा – रुपये 1.5 लाख.<br>2. AHP – PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाऊचर च्या स्वरुपात अनुदान.<br>3. अतिरिक्त अनुदान – तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG – Technical Innovation Grant) :- रुपये 1,000/- चौ.मी. प्रति घरकुल | 1. राज्य हिस्सा – रुपये 1 लाख.<br>2. AHP – PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाऊचर च्या स्वरुपात अनुदान.<br>3. अतिरिक्त अनुदान – तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG – Technical Innovation Grant) :- रुपये 500/- चौ.मी. प्रति घरकुल |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | ARH | 1. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>2. प्रतिकृती 2 अंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG) :- रुपये 2,000/- चो. मी. | 1. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>2. प्रतिकृती 2 अंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG) :- रुपये 2,000/- चो. मी. |

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 योजनेंतर्गत घटक व त्यांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती महा. शासन निर्णय 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 मध्ये नमूद प्रमाणे असेल.

**अधिमुल्य (Premium)/विकास शुल्क (Development Charges) भरण्यास सवलत** -

- BLC घटकाअंतर्गत लाभ घेणे करिता अर्जदार / संभाव्य लाभार्थी यांचेकडे स्त:ची जमिन उपलब्ध असणे व त्या जागेवर लाभार्थ्यांना इमारत बांधकामा परवाना मंजुर करुन घेणे आवश्यक आहे.
- प्रधानमंत्री आवास योजना 1.0 मध्ये बांधकाम परवाना मंजुरी करिता आवश्यक विकास शुल्क / अधिमुल्य मध्ये केंद्र व राज्य शासनाने सवलत दिलेली नव्हती,
- परंतु BLC घटकांतर्गत लाभार्थ्यांना अधिमुल्य (Premium) / विकास शुल्क (Development Charges) आकारण्यात येऊ नये असी सवलत राज्य शासनातर्फे देण्यात आली असुन केंद्र शासनाने निर्गमित केलेली मार्गदर्शक पुस्तीका प्रआयो शहरी – 2.0 मधिल पान क्रं. 44 वरील 14.2.B.iv अटी मध्ये "Exemption of all Statutory Charges Such as development Charges, Scrutiny Charges, layout deposit and other related Charges / fee" असे नमूद केल प्रमाणे सवलत दिलेली आहे.
- तसेच बांधकाम परवाने देण्यासाठी एक खिडकी योजना (Single Window System) राबविण्यात यावी व आवश्यक त्या सर्व मंजुऱ्या 60 दिवसांच्या आत देण्यात याव्यात असे अंमलबजावणी यंत्रणांना निर्देशित केले आहे.

**तरी सदर योजना सभागृहाच्या माहितीस्तव पटलावर ठेवण्यात येत असून खालील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर आहे.:-**

1. केंद्र शासनाने नुकत्याच घोषीत केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 मध्ये सहभागी होण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन त्यास मंजूरी प्रदान करणे.
2. या योजनेअंतर्गत शासनाचे अटीशर्ती नुसार आवश्यक पुर्तता वेळोवेळी करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., नागपूर यांना प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन त्यास मंजूरी प्रदान करणे.
3. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 योजनेची नागपूर शहरात अंमलबजावणी प्रधानमंत्री आवास योजना कक्ष, महानगरपालिका तथा झोपुप्रा नागपूर तर्फे करण्याचे मंजुरी प्रदान करणे.
4. राज्य शासनाचे शासन निर्णय क्रं. प्रआयो – 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 नुसार BLC घटकांतर्गत लाभार्थ्यांना अधिमुल्य (Premium)/विकास शुल्क (Development Charges) आकारण्यात येऊ नये असी सवलत राज्य शासनातर्फे देण्यात आली असुन त्यास मंजूरी प्रदान करणे.
5. BLC घटकांतर्गत इमारत बांधकाम परवाना मंजुरी करिता एक खिडकी योजना (Single Window System) राबविणे करिता U.D.C.P.R. मधिल Clause no. 2.1.2 Annexure – K &K1 (Low Risk Category) प्रामणे बांधकाम परवाने मंजुरीची कार्यवाही करणेकरीता मंजुरी प्रदान करणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 116/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 04/01/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजना कक्ष, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात तथा नागपूर शहरात अंमलबजावणी माहे डिसेंबर 2015 पासून करण्यात आली असुन सदर योजनेची मुदत डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात येत आहे. मात्र, अजूनही देशात परवडणा-या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दि.01/09/2024 पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची देशात अंमलबजावणी करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून राज्य शासनाने शासन निर्णय क्रं. प्रआयो – 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 अन्वये सदर योजना राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 ही योजना नागरी क्षेत्राकरीता दि.01/09/2024 पासुन पाच वर्षाकरीता राबविण्यात येणार आहे. सर्व पात्र कुटुंबाना / लाभार्थ्यांना घर उपलब्ध करून देण्याकरीता केन्द्र शासनाच्या आर्थीक सहाय्याने राज्य शासनामार्फत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

**<u>सदर्हु योजनेची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत</u> -**

- सदर योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) शौचालय व अन्य पायाभूत नागरी सुविधांसह 30 चौ.मी. ते 45 चौ.मी. (चटई क्षेत्रफळ) पर्यंतची घरे बांधण्यास परवानगी आहे.
- सदर योजनेंतर्गत खालील चार घटकांचा समावेश आहे.
  i. वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधकाम (BLC)
  ii. भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (AHP)
  iii. भाडे तत्वावर परवडणारी घरे (ARH)
  iv. व्याज अनुदान योजना (ISS)

**<u>योजनेकरीता पात्र लाभार्थी निकष</u>** :-

- लाभार्थी कुटुंबामध्ये, पती – पत्नी व अविवाहीत मुले / मुली यांचा समावेश असेल.
- या योजनेतंर्गत अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.
- लाभार्थ्यांने गेल्या 20 वर्षात कोणत्याही शासकीय (घरकुल) योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**<u>पात्र लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा</u> -**

- दहा लाखाहून जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी (EWS)रुपये 6 लाख इतकी कमाल वार्षीक उत्पन्न मर्यादा निश्चित केलेली आहे.

**केंद्र व राज्य शासनातर्फे योजनेतंर्गत घटक निहाय लाभ** –

| अक्रं | घटक | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|---|
| 1 | BLC | रुपये 1.5 लाख प्रति लाभार्थी | रुपये 1 लाख प्रति लाभार्थी |
| 2 | AHP | 4. केंद्र हिस्सा – रुपये 1.5 लाख.<br>5. AHP – PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाऊचर च्या स्वरुपात अनुदान.<br>6. अतिरिक्त अनुदान – तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG – Technical Innovation Grant) :- रुपये 1,000/- चौ.मी. प्रति घरकुल | 4. राज्य हिस्सा – रुपये 1 लाख.<br>5. AHP – PPP साठी रिडिमेबल हौसिंग व्हाऊचर च्या स्वरुपात अनुदान.<br>6. अतिरिक्त अनुदान – तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान (TIG – Technical Innovation Grant) :- रुपये 500/- चौ.मी. प्रति घरकुल |
| 3 | ARH | 3. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>4. प्रतिकृती 2 अंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG) :- रुपये 2,000/- चो. मी. | 3. ARH अंतर्गत कोणतेही अनुदान नाही.<br>4. प्रतिकृती 2 अंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान अनुदान (TIG) :- रुपये 2,000/- चो. मी. |

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 योजनेंतर्गत घटक व त्यांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती महा. शासन निर्णय 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 मध्ये नमूद प्रमाणे असेल.

**अधिमुल्य (Premium)/विकास शुल्क (Development Charges) भरण्यास सवलत** -

- BLC घटकाअंतर्गत लाभ घेणे करिता अर्जदार / संभाव्य लाभार्थी यांचेकडे स्त:ची जमिन उपलब्ध असणे व त्या जागेवर लाभार्थ्यांना इमारत बांधकामा परवाना मंजुर करुन घेणे आवश्यक आहे.
- प्रधानमंत्री आवास योजना 1.0 मध्ये बांधकाम परवाना मंजुरी करिता आवश्यक विकास शुल्क / अधिमुल्य मध्ये केंद्र व राज्य शासनाने सवलत दिलेली नव्हती,
- परंतु BLC घटकांतर्गत लाभार्थ्यांना अधिमुल्य (Premium) / विकास शुल्क (Development Charges) आकारण्यात येऊ नये असी सवलत राज्य शासनातर्फे देण्यात आली असुन केंद्र शासनाने निर्गमित केलेली मार्गदर्शक पुस्तीका प्रआयो शहरी – 2.0 मधिल पान क्रं. 44 वरील 14.2.B.iv अटी मध्ये "Exemption of all Statutory Charges Such as development Charges, Scrutiny Charges, layout deposit and other related Charges / fee" असे नमूद केल प्रमाणे सवलत दिलेली आहे.
- तसेच बांधकाम परवाने देण्यासाठी एक खिडकी योजना (Single Window System) राबविण्यात यावी व आवश्यक त्या सर्व मंजुऱ्या 60 दिवसांच्या आत देण्यात याव्यात असे अंमलबजावणी यंत्रणांना निर्देशित केले आहे.

**तरी सदर योजना सभागृहाच्या माहितीस्तव पटलावर ठेवण्यात येत असून खालील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर आहे.:-**

1. केंद्र शासनाने नुकत्याच घोषीत केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 मध्ये सहभागी होण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन त्यास मंजूरी प्रदान करणे.
2. या योजनेअंतर्गत शासनाचे अटीशर्ती नुसार आवश्यक पुर्तता वेळोवेळी करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., नागपूर यांना प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन त्यास मंजूरी प्रदान करणे.

3. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 योजनेची नागपूर शहरात अंमलबजावणी प्रधानमंत्री आवास योजना कक्ष, महानगरपालिका तथा झोपुप्रा नागपूर तर्फे करण्याचे मंजुरी प्रदान करणे.
4. राज्य शासनाचे शासन निर्णय क्रं. प्रआयो – 2024/प्रं.क्रं.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 नुसार BLC घटकांतर्गत लाभार्थ्यांना अधिमुल्य (Premium)/विकास शुल्क (Development Charges) आकारण्यात येऊ नये असी सवलत राज्य शासनातर्फे देण्यात आली असुन त्यास मंजूरी प्रदान करणे.
5. BLC घटकांतर्गत इमारत बांधकाम परवाना मंजुरी करिता एक खिडकी योजना (Single Window System) राबविणे करिता U.D.C.P.R. मधिल Clause no. 2.1.2 Annexure – K &K1 (Low Risk Category) प्रामणे बांधकाम परवाने मंजुरीची कार्यवाही करणेकरीता मंजुरी प्रदान करणे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.